भोसरी पोलीस स्टेशन पिंपरी चिंचवड आयुक्तालय
पत्ताः- पुणे नाशिक हायवे, सी. आय. आर. टी. जवळ, एमआयडीसी भोसरी,
पुणे.२६ फोन नं. ०२०- २७१२४७२८
ई--मेल आयडी psbhosari.pcpc-mh@gov.in

# जनावरे रस्त्यावर सोडणाऱ्या जनावर मालकांचे विरुध्द गुन्हे दाखल

---

भोसरी पोलीस ठाणेचे हद्दीमध्ये पुणे नाशिक रोडवर, चांदणीचौक, राजमाता जिजाऊ उड्डाण पुल भोसरी येथे सार्वजनिक ठिकाणी रस्त्यावर मोकाट जनावरे फिरताना मिळुन आली. सदर जनावरामुळे सर्व सामान्य लोकांना उपद्रव होईल, रोगराई पसरेल, तसेच सध्या महाराष्ट्र राज्यात जनावरांमध्ये लम्पी स्किन संसर्गजन्य आजाराचा प्रादुर्भाव मोठया प्रमाणात वाढत आहे. सदर आजाराने मोठया प्रमाणात जनावरे बाधीत होऊन मृत्युमुखी पडत आहेत. आपल्या अशा कृत्यामुळे रस्त्यावरुन जाणाऱ्या वाहनांना व सार्वजनिक रहदारीस अडथळा होवुन वाहनाचा अपघात होऊन गंभीर दुखापत होऊन जिवीतहानी होऊ शकते. हे माहित असताना कोणीतरी अज्ञात इसमाने त्याचे मालकीची जनावरे रस्त्यावर मोकाट सोडुन शासनाने संसर्गजन्य रोगाचे अनुषंगाने केलेल्या नियम व कायदे संदर्भात जारी करण्यात आलेल्या आदेशांचा भंग केलेला आहे.

असे कृत्य करणाऱ्या लोकांना प्रतिबंध व्हावा, त्यांना जरब बसावा. तसेच सर्वसामान्य लोकांचे हित लक्षात घेवुन मा.अंकुश शिंदे सो, पोलीस आयुक्त,पिंपरी चिंचवड, मा.डॉ.संजय शिंदे सो, अपर पोलीस आयुक्त, मा.मंचक इप्पर सो,पोलीस उप-आयुक्त, मा.डॉ.सागर कवडे, सहायक पोलीस आयुक्त, भास्कर जाधव, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, अरविंद पवार, पोलीस निरीक्षक(गुन्हे), भोसरी पो.ठाणे, यांचे प्रत्यक्ष मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक, सुहास खाडे यांनी भोसरी पो.ठाणे गुन्हा रजी. क्रमांक ८३७/२०२२ भादवि कलम- २६९ महाराष्ट्र पोलीस कायदा कलम-१०६/११७ प्रमाणे दि. १७.१०.२०२२ रोजी व पोलीस नाईक भिल्लु राठोड यांनी भोसरी पो.ठाणे गुन्हा रजी. क्रमांक ८३८/२०२२ भादवि कलम- २६९ महाराष्ट्र पोलीस कायदा कलम-१०६/११७ प्रमाणे दि. १७.१०.२०२२ रोजी अज्ञात जनावर मालकाचे विरुध्द गुन्हा दाखल केलेले आहेत. सदर गुन्हयांचे तपास पोहवा भोसले, पोहवा चपटे हे करित आहेत. वरील प्रमाणे दाखल केलेल्या गुन्हयातील अज्ञात जनावर मालकांचा भोसरी पोलीस ठाणे कडील पोलीस शोध घेत आहेत. असे कृत्य करणाऱ्या इसमांना लवकरात लवकर सदर गुन्हयात अटक केली जाईल.

(मंचक इप्पर)
पोलीस उप आयुक्त
परिमंडळ-१, पिंपरी चिंचवड

Scanned with CamScanner